GOLDEN RESEARCH THOUGHTS

GRT

ISSN: 2231-5063
IMPACT FACTOR : 4.6052(UIF)
VOLUME - 8 | ISSUE - 2 | AUGUST - 2018

# छत्रपती शिवाजी महाराजांची शासन व्यवस्था आणि आजची लोकशाही शासन व्यवस्था एक तुलनात्मक अभ्यास

वामन रामराव वैद्य
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, इतिहास स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय,
मंठा, जि. जालना, महाराष्ट्र.

## प्रस्तावना:-



इ.स.१९ फेब्रुवारी १६३० रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर झाला. आणि इ.स. १६४७ साली स्वराज्याची स्थापना केली. स्वराज्य म्हणजे रयतेचे राज्य निर्माण केले शिवाजी महाराजांनी राजेशाहीत लोकशाही सारखा राज्यकारभार म्हणजे प्रशासन व्यवस्था निर्माण केली होती.

## शिवाजी महाराजांच्या शासन व्यवस्थेचे आधारभूत तत्वे:-

१) किल्ल्यांच्या साह्याने स्वराज्याचे रक्षण करणे.
२) नोकरांना वतना ऐवजी नगद वेतन देणे.
३) सरकारी नोकऱ्या गुणवंतांना देणे कुलवंत किंवा वंशपरंपरागत देण्यात येत नव्हत्या.
४) महसूल जमीन दाराकडून वसूल न करता सरकार तर्फे वसूल करणे.
५) जमीन महसूल यांचा लिलाव न करणे.
६) प्रशासनाची विविध खात्यात विभागणी करणे.
७) जात, धर्म वगैरे भेद न ठेवता सरकारी नोकरीची सर्वांना समान संधी देणे.
८) धार्मिक सहिष्णुता ठेवणे.
९) देशमुख, वतनदार, जहागीरदार यांची शक्तीं वाढू देणे.
१०) शिलकी अंदाज पत्रक बनविणे.
११) रयतेचे राज्य निर्माण करणे.

असा शिवरायांच्या प्रशासनाचा मुळ ढाच्या होता. म्हणजे थोडक्यात सांगायचे झाले तर स्वराज्यात स्वातंत्र्य समता व बंधुत्व होते. हीच आजच्या लोकशाहीची तत्वे आहेत. प्रशासनाच्या सोयीसाठी स्वराज्याचे प्रांत, शुभा, परगणा, तर्फ मौजा असे विभाग पाडले होते.

राजधानी:-इ.स.१६४७ ते १६६७.राजगड व नंतर इ.स.१६६८ ते १६८० रायगड येथून केंद्रीय प्रशासनाची सूत्रे हलविण्यात येत असतात.

### केंद्रीय प्रशासन:-

### छत्रपती शिवरायाचा राज-पदाचा सिद्धांत

स्वराज्याचा सर्वश्रेष्ठ स्वामी छत्रपती असून त्यांच्या मदतीस अष्टप्रधान मंडळ होते. अष्टप्रधानमंडळाचे अष्टप्रधान याची नियुक्ती व बडतर्फी करण्याचा छत्रपतीस पूर्ण अधिकार होता. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक इ.स.१६७४ मध्ये केला असला तरी यापूर्वीच त्यांनी छत्रपती हा किताब घेतला होता. छत्रपती स्वतः अनियंत्रित हुकूमशहा असले तरी ते ईश्वरी वरदान सिद्धांताप्रमाणे वागताना दिसत नाहीत. महाराज म्हणत असत की श्रींच्या कृपेने राज्य मिळाले असून हे राज्य श्रींचे आहे. म्हणजेच हे राज्य रयतेचे आहे, भोसले वंशाचे नाही असा यातून अर्थ निघतो. छत्रपती स्वतःला प्रजेचा सेवक समजत असत केवळ शांतता आणि सुव्यवस्था हे छत्रपतींचे कर्तव्य नसून राज्यातील सर्व प्रजा सुखी करणे हे त्यांचे आद्य कर्तव्य ते समजत असत छत्रपतींची आज्ञा मोडणारा व स्वराज्याचा विरोध करणाऱ्याला कडक शासन करण्यात येईल.

### शिवाजी महाराजांच्या मुलकी व्यवस्थेची काही ठळक वैशिष्ट्ये

१) छत्रपती शिवरायांचे राज्य हे मोगलां सारखे धार्मिक नसल्याने किंवा केवळ हिंदूंचे रक्षण करणे हा त्यांच्या साम्राज्याचा हेतूनसल्याने त्यांची राजवट ही आजच्या लोकशाही प्रमाणे धरण धर्मनिरपेक्ष होती. मुलकी व लष्करी प्रशासन व्यवस्थेत त्यांचा हा धर्मनिरपेक्षता दृष्टिकोन दिसून येतो.

२) लोक कल्याणकारी दृष्टिकोन समोर ठेवून त्यांनी प्रशासन या व्यवस्थेची चौकट निर्माण केली होती.

३) समाजातील सर्व धर्म जाती पंथाच्या लोकांना त्यांनी त्यांच्या गुणवत्ते प्रमाणे समान संधी दिली जात होती.

४) वतने न देण्याचे धोरण शिवाजी महाराजांनी अमलात आणले होते. त्यामुळे वतनदारांच्या अत्याचार व जुलमातून प्रजा मुक्त झाली होती.

५) भ्रष्टाचाराचे प्रशासनातून उच्चाटन केले होते.

६) कोणतेही पद वंशपरंपरागत किंवा जात, धर्म, पंथ इत्यादी गोष्टी न पाहता पात्रता व कर्तबगारी वरच दिले जात असे.

७) कार्यक्षमता हे शिवाजीच्या प्रशासनाचे खास वैशिष्ट्य होते.

### शिवाजीराजांचे प्रशासन

१) अष्टप्रधानमंडळ २) महसूल प्रशासन ३) लष्करी प्रशासन ४) किल्ले प्रशासन.

ऋषी शुक्राचार्य यांनी फार प्राचीन काळी असे प्रतिपादन केले होते, की मुलकी शासन व्यवस्था व लष्करी शासन व्यवस्था ही राज्याच्या रथाची दोन चाके आहेत. त्यापैकी एक चाक जरी नसले तरी तो रथ निकामी होईल.

सैन्यावाचून राज्य, धन व पराक्रम यांना काही अर्थ उरत नाही.

मुलकी प्रशासन:-छत्रपतींनी मुलकी प्रशासनासाठी स्वराज्याचे चार विभाग पाडले होते.

१) पहिल्या विभागात उत्तर कोकणापासून साल्हेर मुल्हेर व पुण्या पर्यंतचा प्रदेश होता. या सर्व सुविधा यावर मोरोपंत पिंगळे यांची नियुक्ती करण्यात आली होती.

२) दुसऱ्या विभागात कर्नाटकातील धारवाड पासून ते कोपल पर्यंतचा प्रदेश होता
या शुभ्यावर दत्ताजी वाकेनवीस यांची नियुक्ती केली होती.

३) तिसऱ्या विभागात दक्षिण कोकण व कारवार पर्यंतची कोकणपट्टी व कारवार पर्यंतच्या किनारपट्टीचा समावेश होता. अण्णाजी दत्तो हे या सर शुभ्याचे प्रमुख होते.

४) चौथ्या विभागात म्हैसूर व मद्रास राज्यातील प्रदेशाचा समावेश होत असे. हरजीराजे महाडिक हे या सर शुभ्याचे प्रमुख होते.

### अष्ट प्रधान मंडळ.

अष्टप्रधानमंडळ हे शिवाजी महाराजांच्या राज्य कारभाराचे खास वैशिष्ट्य होय. शिवाजी महाराजांनी त्या काळाची गरज लक्षात घेऊन राज्य कारभाराचे आठ विभागात विभाजन करून प्रत्येक विभागावर एक प्रधान नियुक्त केला होता.

१) पेशवा:-(प्रधानमंत्री) स्वराज्यातील अधिकाऱ्यावर देखरेख करणे आणि छत्रपतीच्या अनुपस्थितीत राज्यकारभार सांभाळणे ही पेशव्यांची प्रमुख कामे असून त्यास वार्षिक १५००० होन पगार मिळत असे, म्हणजे दर महा ४३७५ रु.

२) मुजुमदार ( आमात्य) हा महसूल मंत्री असून त्याचे वार्षिक वेतन १२००० होन होते.

३) सूरनीस ( सचीव) अर्थमंत्री अण्णाजी दत्तो वेतन ३०००.

४) वाकेनवीस (मंत्री) छत्रपतींचा खाजगी सल्लागार दत्ताजी त्र्यंबक वेतन ३०००.

५) सरनौबत (सेनापती) सैन्याचा सेनापती हंबीरराव मोहिते हे सेनापती होते त्यांचे वेतन ३०००.

६) डबीर (सुमंत) परराष्ट्रमंत्री रामचंद्र त्र्यंबक वेतन ३०००.

७) न्यायाधीश-रावजी निराजी वेतन ३०००.

८) पंडितराव (धर्ममंत्री) वेतन ३०००.

### छत्रपती शिवाजी महाराजांची लष्करी व्यवस्था

शिवरायांनी स्वराज्यात आदर्श लष्करी संघटना उभारली होती. त्यामध्ये घोडदळ, पायदळ, किल्ले, आरमार, तोफखाना, हत्ती, उंट असे सैन्य होते.

### शिवाजी महाराजांच्या सैन्याची कडक शिस्त.

१) लष्करामध्ये बायको बटकीण व कलावंतीण आणू नये. जो आणील त्याची गर्दन उडवली जाईल.

२) शत्रुकडील स्त्रियांना छळू नये, पकडू नये, त्यांच्यावर बदअंमल म्हणजे बलात्कार करू नये, त्यांना भ्रष्ट करू नये.

३) गरीब साधु फकीर यांना लुटू नये.

४) तांबे पितळ वगैरे हलक्या वस्तूंना हात लावू नये.

५) हिरे माणिक मोती सोने-चांदी वगैरे मौल्यवान वस्तू ठेवाव्यात व त्या सरकार जमा कराव्यात.

हे नियम मोडणाऱ्या कडक शासन करण्यात येत असे. शिवाजी महाराजांचे सैनिक नेपोलियन सारखे पोटावर चालत नसून निष्ठेवर वर चालत असे.

**हेरखाते:-**शिवरायांचे हेरखाते अत्यंत कार्यक्षम होते. त्यांना फार मोठे यश हेरांनी आणलेल्या अचूक माहिती मुळे मिळाले होते बहिर्जी नाईक हे हेर प्रमुख होते.

आजच्या लोकशाही राज्यांशी तुलना केली तर शिवरायांचे राज्य काकणभर श्रेष्ठ ठरेल. आजची लोकशाही ही शिवरायांनी अगोदरच राबविली होती. जे शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे जे वैशिष्ट्ये ठरविले होते, तेच आजच्या लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे. आज

धर्मनिरपेक्ष राज्य आहे. शिवरायांनी सुद्धा धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण केले होते. स्वातंत्र्य, समता, व एकात्मता हे तत्त्वे स्वराज्यात होते. आजच्या लोकशाहीत ही तत्त्वे आहेत. आज मंत्रिमंडळ आहे त्यावेळी सुद्धा अष्टप्रधानमंडळ होते आज वेतन पद्धती आहे त्यावेळी सुद्धा वेतन पद्धती होती आज निवडणूक आहे. त्यावेळी मात्र निवडणूक नव्हती एवढाच फरक आहे खरोखर सामान्य जनतेचे म्हणजे रयतेचे राज्य होते आज मात्र लोकशाही असून सामान्य व गरीब माणसाचे काही खरे नाही. आजची लोकशाही जातीवाद, धर्मवाद, आरक्षण, भ्रष्टाचाराने पोखरून गेलेली दिसून येते. शिवकाळात भ्रष्टाचार नव्हता शिव काळ हा आदर्श काळ होता.

## संदर्भग्रंथ

१)प्रा.देशमुख मा.म. मध्ययुगीन भारताचा इतिहास.
२) डॉ.गाठाळ एस.एस. मराठ्यांचा इतिहास.
३) कुलकर्णी अ.रा. मराठ्यांचा इतिहास.
४) सरदेसाई गो.स. मराठी रियासत